# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-८८८/२०२२

**अपिलार्थी, श्री.निलेश सुरेश चव्हाण**

**मु.पाटील आळी, पो.ता.वाडा, जि.पालघर ४२१ ३०३**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
वाडा नगरपंचायत, वाडा
मु.पो.ता.वाडा, जि.पालघर ४२१ ३०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत, वाडा
मु.पो.ता.वाडा, जि.पालघर ४२१ ३०३

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१.२०२२ | १५.२.२०२२<br>१४.३.२०२२ | २३.२.२०२२ | ---- |

अपिलार्थी यांनी दि. १६.३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती वेळेत दिली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. पायल अमृत महाले तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. विवेक विश्वास घायवट आणि विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री. मनोज काशिनाथ पष्टे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (*नगरपंचायत वाडा हद्दीतील घर अथवा इमारतीच्या बांधकामाची आकारणी करताना अर्जदाराकडून इमारत पूर्णत्वाचा दाखल असणे बंधकारक आहे याची माहिती व इतर माहिती.*) "

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती मिळाली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना माहिती दि.१५.२.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आली होती. त्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थींनी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, मुद्दा क्र. ३ व ४ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी देणे आवश्यक आहे असे आदेश पारित केले. मुद्दा क्र. १ बाबत त्यांनी असे मत नोंदविले की, कोणतीही माहिती विचारली नाही. व मुद्दा क्र. २ बाबत विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची असल्याने ती पुरविणे बंधनकारक नाही.

त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.३.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना असे कळविले की, "मुद्दा क्र. ३ बाबत, सदर माहिती सोबत जोडत आहे. व मुद्दा क्र. ४ बाबत माहिती निरंक असल्याचे कळविण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र अपिलार्थींना माहिती पुरविण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे. तथापि, मुद्दा क्र. १ व २ ची माहिती अधिक खुलाशाने अपिलार्थीस देता येऊ शकली असती असे माझे मत आहे.

मुद्दा क्र. १ मध्ये, "नगरपंचायत वाडा हद्दितील घर अथवा इमारतीच्या बांधकामाची आकारणी करताना अर्जदाराकडून इमारत पूर्णत्वाचा दाखला असणे बंधनकारक आहे किंवा कसे याबाबत अपिलार्थींना कायदेशीर तरतुद कळविता येऊ शकली असती. त्याचप्रमाणे मुद्दा क्र.२ मध्ये, अनधिकृत इमारतीची आकारणी केल्यानंतर त्या इमारतीच्या

असेसमेंट व घरपट्टी यांच्यावर अनधिकृत असे शिक्के मारणे बंधनकारक आहे किंवा कसे याबाबतसुध्दा नगरपंचायतीतील कार्यपध्दतीचे अनुषंगाने उत्तर देऊ शकले असते.

यास्तव विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. १ व २ ची माहिती अपिलार्थी यांना पुढील १५ दिवसांत विनामुल्य पुरिवणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाडा नगरपंचायत, वाडा यांनी **अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ व २ बाबत उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे माहिती पुढील १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० मे, २०२४

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**